

## रवींद्रनाथ टागोर






विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२


## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय 📖 साहित्य

छोटी छोटी पण आशय प्रधान असलेली कवितांची कडवी, प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या पद्य रचना आणि त्याचे जोडीला तालवाद्यांचे सूर या माध्यमातून रवींद्रसंगीत सहजपणे जनमानसात पोहोचले आणि लोकप्रियही झाले.

आपल्या संगीतकारकिर्दीच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये त्यांनी आपल्या गीत आणि संगीतात आणखी वेगवेगळे प्रयोग केले. शास्त्रीय संगीत आणि लोकगीतांमध्ये त्यांनी आपल्याला हवे त्याप्रमाणे बदल करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संगीतात माहिती नसलेला कंपोझिशन हा नवीन प्रकार त्यांनी रूढ केला आपल्या संगीत प्रवासात दोन ते अडीच हजारांपेक्षा जास्त गीते लिहून स्वतः त्यांना चाली लावल्या त्याचप्रमाणे त्यांनी नाटक, संगीत आणि नृत्य या तीन कलांचा अद्भुत असा त्रिवेणी संगम घडवून आणला. रवींद्रनाथांचे संगीत हे अस्सल भारतीय असून आज बंगालमधील घराघरांमध्ये तसेच देशाच्या विविध भागांमध्ये निनादत आहे. त्याचे कारण म्हणजे त्याची लोकाभिमुखता आणि हृदयाला भिडण्याची क्षमता.

रवींद्रनाथ स्वतः उत्कृष्ट गायक होते राष्ट्रीय काँग्रेसचे कलकत्त्यात जेव्हा अधिवेशन झाले तेव्हा त्यांनी वंदे मातरम हे गीत अत्यंत तन्मय होऊन म्हटले. त्यांनी गायलेल्या गीतांचा श्रोत्यांवर दीर्घकाळ प्रभाव असायचा. त्यांचे आमार शोनार बांगला हे बांगलादेशचे राष्ट्रगीत असो की आपल्या देशाचे राष्ट्रगीत जन-गण-मन या त्यांच्या रचना अत्यंत अप्रतिम आहेत. आपल्या देशावर तर त्यांचे सर्वच क्षेत्रातील कायमचे न फिटणारे ऋण आहे. रवींद्र संगीताचा प्रभाव बंगालमधील घराघरात आहे. रोबिन्द्रो शोंगीत म्हणून ते प्रसिद्ध आहे. बंगालमध्ये त्याला लोकसंगीताचे मोल प्राप्त झाले आहे. अनेक संगीतकार आणि कवींनी रवींद्र संगीतापासून प्रेरणा घेतली. बॉलिवूडमधील अनेक गीते रवींद्र संगीतावर आधारित आहेत. रवींद्रनाथांनी या क्षेत्रातही एवढे प्रचंड काम करून ठेवले आहे की त्याचा मागोवा घेतल्याशिवाय संगीतकार आणि गायकांना पुढे जाता येत नाही. ''जोदी तारे नाइ चीनी गो शेकी'' हे रवींद्र संगीतातील गाणे वेगवेगळ्या गायकांनी गायले आहे. लिजंडरी सिंगर किशोरकुमार यांनी तर हे गाणे इतके अप्रतिम म्हटले आहे की ऐकताना जणू आपली समाधी लागते. जिज्ञासूंनी हे गीत यु ट्यूबवर अवश्य ऐकावे. याच गीताचा वापर अभिमान चित्रपटातील तेरे मेरे मिलन की ये रैना या गीतात फार सुंदर केला आहे. तसेच चंदा देखे चंदा हे झूठी चित्रपटातील गाणे आमी तोमाय जातो या मुखड्यावरून आणि जोदी तारो या गीतावर आधारित आहे. जलते है किसके लिये, जाये तो जाये कहा, मेघा छाये आधी रात, छुकर मेरे मन को यासारखी अनेक गाणी रवींद्र संगीतावरून प्रेरणा घेऊन जन्माला आली आहेत. संगीतकार अनिल विश्वास, आर डी बर्मन, हेमंतकुमार, सलील चौधरी आदी अनेक संगीतकारांनी रवींद्र संगीताचा वापर आपल्या गीतांमध्ये करून घेतलेला दिसतो. रवींद्रनाथांनी लिहिलेले एकला चलो रे या गाण्याचा वापर तर अनेक संगीतकारांनी आणि गायकांनी वेगवेगळ्या प्रकारे आपल्या कार्यक्रमात केला आहे. संगीत म्हणजे दोन आत्म्यानमधील दुवा असे रवींद्रनाथ म्हणत असत. त्यांच्या संगीताच्या धाग्याने खरे तर संपूर्ण भारतवर्ष जोडले गेले आहे.

## रुटीन जीवन जगण्यापेक्षा जीवन शैलीत बदल करून जीवनाचा आनंद द्विगुणीत करा - लता वाघचौरे

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – जि. प. प्रशाला अंबेलेहळ ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अप्रतिम आणि अतुलनीय स्नेह मिलन कार्यक्रम १ जून २०२५ रोजी संपन्न झाला.

जि. प. प्रा. शा. अंबेलोहळ व जि. प. प्रशाला अंबेलोहळ ता. गंगापूर येथील विद्यार्थी बॅच सन २००६-२००७ च्या विद्यार्थांनी आयोजित केलेला गेट टू गेदर अर्थात (स्नेहमिलन सोहळा) २०२५ अत्यंत दिमाखदार पद्धतीने आज रोजी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत पुणे हायवेवर हॉटेल वृंदावन या ठिकाणी उत्साहवर्धक आनंदीमय वातावरणात पार पडला. त्याबद्दल सर्व प्रथम हा कार्यक्रम हाती घेणारे आघाडीचे फलंदाज मंगेश, फिरोज, जावेद, अरुण, राजेश, किशोर, विद्या व ज्ञात अज्ञात सर्वांचे खूप कौतुक करण्यात आले.

कार्यक्रम हा १८ वर्षापूर्वी इयत्ता १०वी झालेल्या विद्यार्थी विद्यार्थीनीसाठी आयोजित असल्यामुळे पुन्हा एकदा आजच्या दिवशी १ जून २०२५ रोजी शाळा भरली. असे वाटत होते. सुरुवातीला सर्व विद्यार्थी विद्यार्थीनीना तसेच गुरुजनांचा मानाचा फेटा बांधण्यात आला होता. व गेटपासूनच प्रत्येकाच्या हातात गुलाब पुष्प देऊन स्वागत केले जात होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचलन सन्मा. एच. पी दादा यांनी केल्यामुळे कार्यक्रमांची रंगत वाढतच चालली होती.

सर्व प्रथम कडक आवाजात आर्डर ऐकू आली व सामुहिक राष्ट्रगीत म्हटले गेले. ज्या विद्यार्थ्यानीने ( श्रीमती वाघमोडे)८ वी ते १० वी पर्यंत प्रार्थना म्हटली होती पुन्हा त्याच विद्यार्थ्यीनीने अप्रतिम प्रार्थना गाऊन स्नेह मिलन समारंभाचा आरंभ केला.

शिक्षणाचे आराध्य दैवत व सरस्वती पूजन होऊन ५-६ विद्यार्थी व ४-५ विद्यार्थीनींनी आपले दिलखुलास मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर मा. मुख्याध्यापक वाघचौरे



मॅडम यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, सशक्त बना. व्यायाम करा. निरोगी रहा. छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनाचा आनंद घ्या. श्रीमान जी. एम. पाटील सर म्हणाले की विद्यार्थ्यांनी आई वडीलांची व विद्यार्थ्यीनींनी आपल्या सासू सासऱ्यांची सेवा केली तर जीवनाचे सार्थक मानावे. व्यसनापासून आयुष्यात अलिप्त राहण्याचा सल्ला दिला, चौधरी मॅडम व एन सी. प्रधान सर म्हणाले, आप कमाईवर मोठे व्हा. फुकटाची हरामाची कमाई करू नये. त्यामुळे जीवन बरबाद होते. खरोखरच आजचा कार्यक्रम छान झाला तुम्हा सर्वांचा उत्साह पाहून खूप आनंद झाला आमचे सर्व सहकारीही आम्हाला भेटले अगदी ताट समोर आल्यावर भूकेची जाणीव झाली. असेच सोबत रहा सकारात्मक रहा निरोगी रहा निर्व्यसनी रहा आनंदात रहा हीच सदिच्छा



प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर

मेहनत घेतलीत त्याचे चीज झाले.

श्रीमती मुळे मॅडम. श्रीमान केंद्रप्रमुख काळवणे सर. श्रीमती बरबडे मॅडम, श्रीमती कर्डीले मॅडम , श्रीमान इंगोले सर, श्रीमती वैशाली नंदन-पगारे मॅडम, कवी प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर एच . पी. गांगर्डे सर यांचा शाल पुष्प व स्मृतीचिन्ह देऊन यथोचित गुरुगौरव करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांनी आपली ओळख परेड करून दिली. कोणी मोठा नाही कोणी लहान नाही. सगळेच एका वर्गातील रांगेतील विद्यार्थी म्हणून मोकळ्या मनाने हसत खेळत आपला परिचय देत होते. मध्ये मध्ये शिकक्षांचे अनुभव व त्या वेळेसच्या डॉयलॉगची आठवण ही करून देत होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सर्वांनीच आपला परिचय संपूर्ण सभागृहाला करून दिला.

स्मिता बरबडे यांनी सांगितले की खरोखर आजचा कार्यक्रम खूप अविस्मरणीय आहे ज्यांनी ज्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली त्या सर्वांचे खूप खूप अभिनंदन मुलांनो तुम्ही सर्वांनी आम्हाला बोलावले व आमचा जो सत्कार केला तो माझ्यासाठी एखाद्या आदर्श शिक्षक पुरस्कारापेक्षा खूप अनमोल आहे आज सर्वांना भेटून फार आनंद झाला. असेच भेटत जा, ओळख ठेवा हीच अपेक्षा

तुम्हा सर्वांच्या हातून सत्कार्य घडो, निरोगी राहो तसेच निर्व्यसनी राहोत हीच इच्छा त्यांनी व्यक्त केली.

(क्रमशः)

## अवघे त्र्याहत्तर वयमान सळसळता उत्साह -बिभिषण सातपुते

ज्योतिर्मय 📖 साहित्य

काही माणसे चितरुण असतात. सतत कार्यरत असतात. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता विलसत असते. असेच एक व्यक्तिमत्तव म्हणजे डॉ. बिभिषण सातपुते. गोवा इंजिनअरिंग महाविद्यालयाचे सहायक ग्रंथपाल म्हणून निवृत्त झाल्यावरही ते कार्यरत होते. महाविद्यालयाच्या सुशोभकरणासाठी त्यांनी काम केले. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातून नोकरीधंद्यानिमित्त अनेकजण गोव्यात स्थायिक झाले. अगदी मान मोडेपर्यंत त्यांनी कामे केली. खेड्यात त्यावेळी शिक्षणाच्या सोयी नव्हत्या तरीही जिद्दीने त्यांनी शिक्षण घेतले. धनगर कुटुंबात मेंढरे पालन करण्याचा व्यवसाय. त्या समाजात शिक्षणाचे फारसे महत्त्व नव्हते. तरीदेखील त्यांनी आधी बी. ए. मग एम. ए. पर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर कर्नाटकातील शिमोगा येथील कुंपेबू विश्वविद्यालयातून एम. लिब पदवी प्राप्त केली. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातून त्यांनी पीएच डी. मिळविली.

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत खडतर आयुष्य जगतान त्यांनी संकटांवर मात करून आपले शिक्षण घेतले. त्यांच्या ४५ वर्षांच्या कामाची दखल घेऊन ताळगाव गोवा येथील साहित्यलेणी प्रतिष्ठानने त्यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्याचे ठरविले आहे.

प्रतिकुल परिस्थितीवर मात करून उभारलेलं कर्तृत्व हे खरोखरच अतुलनीय आहे, मी तुझा संघर्ष पाहिलायं तुझ्या या कर्तृत्वाला सलाम असे गौरवोद्गार बार्शी येथील त्यांचे मित्र अंबरुषी लोकरे यांनी काढले आहेत.

गोवा इंजिनिअरिंग महाविद्यालयातील त्यांचे मित्र प्रा. अरुण तेलंग यांनीही त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.

अत्यंत धडपडे व कार्यकुशल असे त्यांचे व्यक्तित्व आहे. अगदी मितभाषी असले तरीही एखाद्या विषयावर अभ्यासपूर्ण बोलण्याचा त्यांचा प्रयास असतो. साहित्यलेणी प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या मराठी दिन कार्यक्रमात त्यांनी कुसुमाग्रजांचा संपूर्ण जीवनपट आपल्या काही मिनिटांच्या भाषणातून उलगडून दाखवला. कुसुमाग्रजाचे बालपण आणि कर्तृत्व, शिरवाडकरांचे साहित्य या विषयावर त्यांनी जे भाषण केले त्याने श्रोते हेलावून गेले. सातपुते सर म्हणजे खूप कष्टसाध्य यशाचे प्रतीक.

एम ई. एस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य माधवराव कामत यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

त्यांनी निवृत्तीनंतर विद्यासागर क्लासेसचे काम ते पाहत आहेत. स्ट्रॉंग फाउंडेशन नावाचे त्यांचे पुस्तक प्रयत्नाने यश मिळविणाऱ्या मुलांच्या जीवनावर आधारित आहे. त्याआधी दोन वर्षे त्यांनी गोव्यातील नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये ग्रंथपाल म्हणून केलेले काम वाखाणण्याजोगे आहे. गोवा इंजिनिअरिंग महाविद्यालयाचा परिसर सुशोभित करण्याचे कामही त्यांनी केले आहे.


प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९


महाविद्यालयाचा परिसर पाहूनच मन तृप्त होते.

अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. कोकण मराठी परिषद, साहित्यलेणी प्रतिष्ठान, साहित्यसेव मंडळ आदींच्या कार्यात ते सक्रिय सहभागी होतात. त्यांच्या



कामाचा झपाटा प्रशंसनीय आहे. त्यांनी फोंडा परिसरातील व पणजीतील साहित्याच्या कामात सहभाग घेतला आहे. इतकी वर्षे समरसून काम करूनही गोमंतकीय लोक आपल्याला भायला (बाहेरचे) म्हणतात अशी खंत ते व्यक्त करतात. त्यांना जीवनगौरव पुरस्काराच्या निमित्ताने दीर्घ आयुरारोग्य लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना

***

## करिअर गाईड




अनिता चव्हाण-राठोड
कै. गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक आश्रमशाळा,
गराडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.
8605655091


### करियर निवडताना...

सध्या पालकवर्गाची लगीनघाई सुरू आहे, ही लगीनघाई आहे प्रवेशासाठी !
१०वी, १२वीचे निकाल लागले, आणि घराघरात धावपळ, गोंधळ, गडबड सुरू झाली.
विद्यार्थ्यांपेक्षा पालकच अधिक चिंतेत दिसतात.
अत्यंत वेगाने धावणाऱ्या या स्पर्धेच्या युगात करियरसाठी असंख्य पर्याय खुले आहेत. अशा वेळी आपल्या पाल्याच्या करियरसाठी योग्य निर्णय घेणे हे खरोखरच एक आव्हानात्मक काम बनले आहे. भविष्यासाठी सजग असणे ही पालकांची जबाबदारीच आहे. मात्र, या भविष्याच्या अतिविचारात जर आपण वर्तमान विसरलो, तर हे स्वप्नातील उज्वल भविष्य घडणार तरी कसे?
मुलांच्या बुद्धिमत्ता, आवड, कल, कौशल्ये, प्रतिभा या बाबींचा विचार न करता, केवळ स्वतःच्या अपेक्षा आणि महत्त्वाकांक्षा मुलांवर लादणे कितपत योग्य आहे? हे चुकीचे आहे, हे माहिती असूनही अनेक वेळा सुसंस्कृत, साक्षर पालकसुद्धा आपल्या मुलांवर हा अन्याय करताना दिसतात.
आपल्या मुलांचे भविष्य खरंच उज्ज्वल व्हावे, त्यांना आयुष्यात यश मिळावे, असा पालकांचा हेतू चांगलाच असतो. मात्र त्यासाठी खालील बाबींचा गांभीर्याने विचार होणे अत्यावश्यक आहे.
पालकांनी या मुद्यांवर नक्की विचार करावा ---

■ मुलांची बुद्धिमत्ता

प्रत्येक मुलाची बौद्धिक क्षमता वेगवेगळी असते. काही मुलांना गणित-शास्त्रात गती असते, तर काहींना भाषांमध्ये. कोणाची तर्कशक्ती चांगली असते, तर कोणाचे स्मरणशक्तीवर उत्तम नियंत्रण असतो. त्यामुळे "बुद्धिमान म्हणजे डॉक्टर किंवा इंजिनिअरच" हा समज सोडून देणे आवश्यक आहे. मुलांच्या बौद्धिक ताकदीचा योग्य अंदाज घेऊन त्याला अनुरूप क्षेत्र निवडल्यास, त्या क्षेत्रात त्यांना उत्तम यश मिळू शकते.

क्रमशः

## इंदापुरी निखारे



### मसाला डोसा...आणि सिगारेट



ज्योतिर्मय 📖 साहित्य

मसाला डोसा... हा शब्द १०/१२ वर्षाचा असताना कानावर पडला... साल साधारण १९६४/६५...

पुढे दोन तीन वर्षांनी... अगदी लपून छपून...

एका हॉटेल मध्ये... कोणालाही न कळू देता...

आस्वाद पहिल्यांदा घेतला... त्या काळी हे मोठे धाडस होते... अगदी जेम्स बॉण्ड सारखे... हे वाक्य आत्ता ॲड केले आहे... तेव्हा जेम्स बॉण्ड माहित नव्हता... ते धाडस बाळपणातील रम्य आठवणी... या मध्ये समाविष्ट आहे... ते धाडस आता तुम्हाला सांगताना... अतिशय विनम्रपणे आपणा सर्वांना सांगताना प्रचंड आनंद होत आहे...

तर आम्ही तिघे मित्र... टेक्निकल मध्ये निवड झाल्याने... टेक्निकल शाळा दूर असल्याने... आठवी मध्ये सायकल न मागता मिळाली... आणि तीन दिवस टेक्निकल शाळा...

म्हणून चार आणे पॉकेटमनी... त्या काळी चार आणे आठवड्यातून तीनदा... म्हणजे दिवाळी असायची... मी एकदा घाबरत घाबरत विचारले...

एव्हढे पैसे कशाला? अजूनही मी श्रावण बाळ आहे... हे दाखविण्याचा प्रयत्न... या वर वडील म्हणाले... शाळा लांब आहे... कधी सायकल पंक्चर झाली, भूक लागली तर... तेव्हांपासून आई एव्हढेच प्रेम... वडिलांवर पण करू लागलो... त्या वयापर्यंत वडिलांची भीती वाटत असे... त्यात त्या काही आगाऊ...

कलाकारांनी एक गाणे केले होते...

आई आणि बाबा यातील कोण आवडे अधिक तुला... त्यांनी विचारच केला नसावा...

बाल मनावर याचा काय परिणाम होणार...

तर एक दिवस... टेक्निकल शाळा संपल्यावर... बटाटे वडा आणि चटणी खात असताना म्हणाला...

आपण एक दिवस मसाला डोसा खाऊ...

तेव्हढे पैसे नाही रे... तो म्हणाला... पैसे मी खर्च करेन... तो मित्र डॉक्टरचा मुलगा... आणि त्याला घरून एक रुपया देत असे... मग धाडस करण्यासाठी... प्लॅन करायला सुरुवात... हॉटेल कोणते? कोणाला दिसले नाही पाहिजे... तो लगेच म्हणाला... बस स्टँड वर जाऊ या... तिथल्या हॉटेल मध्ये कोणी ओळखीचे येणार नाही...आणि बाकीचे ओळखणार नाही...

मग एक दिवस... रस्त्यावरून लपून छपून...

सायकल वरून बस स्टँड वर...हॉटेल मध्ये जायच्या आधी... तो म्हणाला...आपण सिगरेट पण पिऊ या... अरे पण, कोणी पाहिले तर... इकडे तिकडे हळू हळू पहात पहात.. सिगरेट पण...मग हॉटेल मध्ये मसाला डोसा सांगितला... त्याने तिघांना आणून दिला.. मसाला डोसा,

आमटी आणि चटणी, आमटीला सांबार म्हणतात...

हे नंतर कधी तरी समजले... त्याबरोबर एक चमचा आणि एक काटेरी चमचा... पण खायचा कसा?

हे कोणाला समजेना.. मग अगदी हळू आवाजात..

एक निर्णय घेतला... कोणीतरी येईल...

त्याने मसाला डोसा मागितला... की तो कसा खातो... ते निरीक्षण करून खाऊ या... लक आमचे असे की... शेजारच्या टेबल वर एक खेड्यातील माणूस आला आणि त्याने मसाला डोसा सांगितला... आम्ही तिघे अगदी सज्ज होऊन...तो कसा खाणार याकडे... बारीक नजर... त्याला आणून दिला... त्याने वेळ न घालवता...सुरुवात केली आणि आम्ही तिघांनीही...प्लेट मधील चमचे...

त्याने बाहेर काढून टाकले... आम्ही पण लगेचच...

मसाला डोसा... हाताने कुस्करला... आम्ही पण...

मग आमटी आणि चटणी... त्यावर ओतली...

आणि हाताने खायला सुरुवात... आम्ही पण अगदी तंतोतंत त्याच प्रमाणे... नंतर केव्हातरी मसाला डोसा खायला शिकलो... अभ्यास करता करता...

बरेच काही शिकत गेलो...

आणि अजूनही... शिकतच आहे...

## जात्यावरच्या ओव्या......



भाऊ घेतो चोळी
भावजय गुमानात
दोन्हीच्या इशारानं
चोळी बांधा रुमालात ॥१०३॥

भरताराच सुख
सांगते आडावरी
कुकाच्या डब्यार्याला
फिरक्या नानापरी ॥१०४॥

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## फुलमाला....



मधुकामिनी फुल

मोजकी उन्हे, मोजक्या सरी, मोजकेच वारे होते
शेवटी किती मोजले तरी मोजकेच सारे होते
वैभव जोशी....

मधुकामिनीची फुले असतात नावाप्रमाणेच अतीव सुंदर
शुभ्र फुलांचे झाड सहज रुजते,बहर यांचा असे निरंतर
या फुलांचा मादक गंध उधळीत येतो वाऱ्यावरती
त्या गंधाने आकर्षित होऊन फुलपाखरे भिरभिर फिरती..

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज.


ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



## आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर

- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.